CNR MHWR030058792025

# न्या य नि र्ण य

(दि. ११/०३/२०२६)

प्रस्तुत फौजदारी खटला आरोपीविरूध्द महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाच्या कलम ६५(बी)(सी)(ई)(एफ) अन्वये दाखल झाला आहे.

२. अभिलेख पाहिले असता असे दिसून येते की, नि.क्र.०४ वर दोषारोप दाखल करण्यात आले. आरोपीस दोषारोप वाचून दाखविले असता त्याने गुन्हा अमान्य व नाकबूल केला व खटला चालविण्याची मागणी केल्याने खटला चालविण्यात आला. अभियोग पक्षाने केवळ एक साक्षीदार तपासला. त्यानंतर नि.क्र.१ वर आदेश पारीत करून अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

३. प्रस्तुत खटल्याच्या निर्णयाकरिता खालील मुद्दे विचारात घेतले आहेत व आलेल्या पुराव्यावरून त्यावर निष्कर्ष देवून निष्कर्षाची कारणे खालीलप्रमाणे देण्यात आलेली आहेत –

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, दिनांक २३/१०/२०२४ रोजी १३.०० ते १३.४५ वाजेच्या दरम्यान मौजा गोजी शेत शिवार, हनुमान तुरणकर यांचे शेताजवळील नाल्याचे काठी, वर्धा येथे आरोपी मोहादारू गाळत असतांना त्याच्या ताब्यातून ७० लिटर | नाही. |

| | | |
|---|---|---|
| | उकळता मोहा सडवा, ४०० लिटर कच्चा मोहा सडवा रसायन, १२० लिटर गावठी मोहादारू व इतर भट्टी साहित्य अवैधरित्या व विनापरवाना मिळून आले आणि त्याव्दारे तिने कलम ६५(बी)(सी)(ई)(एफ) महाराष्ट्र दारुबंदी कायदा अंतर्गत गुन्हा केला? | |
| २. | आदेश काय ? | आरोपीला निर्दोष मुक्त केले. |

## कारणमीमांसा

**मुद्दा क्र. १ करिता –**

४. आरोपीविरूध्द आरोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने मौका जप्ती पंचनाम्यावरील पंच सा.क.१ मेहमुद्दीन काझी याला तपासले आहे. त्याने सांगितले की, पोलिसांनी त्याला पंचनामा करायला बोलाविले नव्हते व त्याच्यासमक्ष आरोपी विरूध्द कुठलीही कारवाई केली नाही. त्याने मौका जप्ती पंचनाम्यावरील त्याची सही मान्य केली, परंतु त्यातील मजकूर माहीत नसल्याचे सांगितले. त्याने अभियोग पक्षाला मदत न केल्यामुळे अभियोग पक्षाने न्यायालयाचे परवानगीने कलम १५४ भारतीय पुरावा कायदा अन्वये साक्षीदारास उत्तरसुचक प्रश्न विचारले. तरी देखील अभियोग पक्ष आरोप सिध्द करण्यास समर्थ होईल असा कुठलाही पुरावा अभिलेखावर आणू शकले नाही.

५. अभियोग पक्षाचे असे कथन आहे की, मौक्यावरून जप्त केलेल्या मालापैकी काही माल त्यांनी नमूना म्हणून रासायनिक परिक्षणाकरीता काढून घेतला

होता. सदर नमूने रासायनिक परिक्षणाकरीता नागपूर येथील प्रयोग शाळेत पाठविण्यात आले होते. मात्र, अभियोग पक्षास वारंवार संधी देवून देखील तपासी अंमलदार व तथाकथीत रासायनिक परिक्षणाकरीता नमूने वाहून नेणा–या पोलीस कर्मचा–यास तपासले नाही. अभिलेखावर रासायनिक पृथक्करण अहवाल दाखल करण्यात आलेला असला तरी देखील तो अहवाल आरोपीच्याच ताब्यातून जप्त केलेल्या मालाच्या बाबतीत आहे हे सिध्द होवू शकले नाही. तसेच, ते नमूने फिर्यादींच्या कार्यालयातून नागपूर येथील प्रयोग शाळेत कशाप्रकारे व कोणत्या तापमानात नेण्यात आले याबाबत संशय कायम राहतो. त्यामुळे रासायनिक पृथक्करणाकरीता पाठविलेले नमूने दारूचे असल्याचे सिध्द होत असले तरीही ते नमूने आरोपीच्या ताब्यातून जप्त करण्यात आलेल्या मोहा सडवा व मोहा दारूचे होते हे सिध्द करण्यात अभियोग पक्षास अपयश आले आहे. सबब, आरोपी मोहादारू गाळत असतांना त्याच्या ताब्यातून मोहा सडवा, गावठी मोहादारू व इतर भट्टी साहित्य अवैधरित्या व विनापरवाना मिळून आले, हे सिध्द करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरले आहे. त्यामुळे मुद्दा क्र. १ ला नकारार्थी उत्तर देण्यात येत आहे.

**मुद्दा क्र. २ करिता –**

६. अभियोग पक्ष आरोपीविरूध्द कोणताही विशेष पुरावा आणण्यास असफल ठरले आहे. म्हणून आरोपी सदर गुन्ह्यातून दोषमुक्त होण्यास पात्र आहे. सदरहू हे न्यायालय मुद्दा क्र. २ करीता पुढील आदेश पारित करीत आहे –

## आदेश

१) आरोपी हृदयनाथ रामचंद्र वाघमारे याला फौजदारी प्रक्रिया संहिता

कलम २५५(१) अन्वये महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाच्या कलम ६५(बी)(सी)(ई)(एफ) चे गुन्ह्यातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२) आरोपीचे वैयक्तीक/जामीन बंधपत्र रद्द करण्यात येते. प्रकरणात सुरक्षा राशी जमा असल्यास अपिल कालावधी संपल्यानंतर आरोपीस परत करण्यात यावी.

३) जप्त मुद्देमाल जर्मनी घमेले अपील कालावधीनंतर जाहीर लिलावात विकून येणारी रक्कम सरकार जमा करण्यात यावे. गावठी मोहा दारू, मोहा सडवा व इतर साहित्य जप्त असल्यास अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे नाश करण्यात यावी.

४) आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७–अ अन्वये रुपये ५,०००/– चे वैयक्तीक बंधपत्र द्यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषित.)

MANGALA GAJANAN HIVARALE

Digitally signed by MANGALA GAJANAN HIVARALE
Date: 2026.03.11 17:36:08 +0530

वर्धा. (श्रीमती एम. आर. चव्हाण (हिवराळे))

दि. ११/०३/२०२६ न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,

(२रे न्यायालय), वर्धा.